नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 08/10/2023 (रविवार) सकाळ

## नागपूर परिक्षेत्रीय पोलीस क्रिडा स्पर्धा– २०२३ समारोप

नागपूर (ग्रामीण) पोलीस मुख्यालय, टेका नाका येथील कवायत मैदानावर नागपूर परिक्षेत्रीय पोलीस क्रिडा स्पर्धा– २०२३ चे दिनांक रविवार ०८/१०/२०२३ रोजी समारोप समारंभ पार पडला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणुन विशेष पोलीस महानिरीक्षक नागपूर परिक्षेत्र, नागपूर मा. डॉ. श्री. छेरिंग दोरजे (भा.पो.से) व प्रमुख उपस्थिती म्हणुन पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र श्री. संदिप पाटील (भा.पो.से) यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. याप्रसंगी पोलिस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से), पोलिस अधीक्षक चंद्रपुर, श्री. रविंद्र परदेशी (भा.पो.से), पोलिस अधीक्षक भंडारा श्री. लोहित मतानी (भा.पो.से), पोलिस अधीक्षक वर्धा श्री. नुरूल हसन (भा.पो.से), पोलिस अधीक्षक गडचिरोली श्री. निलोत्पल (भा.पो.से), पोलिस अधीक्षक गोंदीया श्री. निखील पिंगळे (भा.पो.से), अपर पोलिस अधीक्षक नागपूर ग्रामीण डॉ. श्री. संदिप पखाले, उपविभागीय पोलिस अधिकारी कन्हान विभाग, सावनेर विभाग, काटोल विभाग, नागपूर विभाग, उमरेड विभाग, ठाणेदार नागपूर ग्रामीण यांची उपस्थिती होती. पोलिस मुख्यालय नागपूर ग्रामीणचे राखीव पोलिस निरीक्षक श्रीमती प्रतिभा भरोसे यांच्या मार्गदर्शनात राखीव पोलिस उपनिरीक्षक श्री. सुनिल ताकसांडे व ६ जिल्हयातील पोलिस खेळाडु यांनी पथसंचलन करून मानवंदना दिली. पुढील वर्षी होणाऱ्या परिक्षेत्रीय पोलिस क्रीडा स्पर्धा सन २०२४ चे आयोजन जिल्हा गोंदीया येथे नियोजित आहे. नागपूर परिक्षेत्रीय पोलीस क्रिडा स्पर्धा– २०२३ मध्ये नागपूर ग्रामीण, चंद्रपुर, भंडारा, वर्धा, गोंदिया, गडचिरोली जिल्हयातील पोलिस खेळाडुंनी यामध्ये विविध खेळात सहभाग घेतला.

या क्रिडा स्पर्धेतील पुरूषाचे सांघिक विजेतेपद चंद्रपूर संघाने तर महिला मध्ये चंद्रपूर विभागाने पटकावला, तर वैयक्तिक क्रिडा स्पर्धामध्ये उत्कृष्ट ॲथलेटीकचा किताब पुरूषामध्ये नाजुक मुहर्ले जिल्हा गडचिरोली तर महिला मध्ये सुनैना डोंगरे जिल्हा वर्धा यांनी पटकाविला. महिला व पुरूषांचे १०० मीटर धावण्याची स्पर्धा मध्ये पुरूषामध्ये अमित मस्के, (प्रथम), पंकज परतेती (द्वितीय) जिल्हा नागपूर ग्रामीण, महिलांचे १०० मीटर धावण्याची स्पर्धा मध्ये सुनैना डोंगरे (प्रथम), जिल्हा वर्धा, अनिता शहारे (द्वितीय) जिल्हा गडचिरोली ने पटकाविला.

क्रिडा स्पर्धेतील विजेते :– सांघिक क्रिडा प्रकार हॉकी मध्ये प्रथम स्थान वर्धा जिल्हा, द्वितीय चंद्रपूर जिल्हा, फुटबॉल मध्ये प्रथम स्थान नागपूर ग्रामीण द्वितीय स्थान चंद्रपूर जिल्हा, हॅडबॉल प्रथम स्थान भंडारा जिल्हा, द्वितीय स्थान वर्धा, व्हॉलीबॉल पुरूषांमध्ये प्रथम स्थान वर्धा जिल्हा, द्वितीय स्थान गोंदीया, व्हॉलीबॉल महिला मध्ये प्रथम स्थान गोंदीया जिल्हा, द्वितीय स्थान चंद्रपूर, बास्केटबॉल पुरूषांमध्ये प्रथम स्थान चंद्रपूर, द्वितीय स्थान वर्धा, बास्केटबॉल महिलां मध्ये प्रथम स्थान भंडारा, द्वितीय स्थान गडचिरोली, खो खो पुरूषामध्ये प्रथम स्थान वर्धा जिल्हा, द्वितीय स्थान गडचिरोली, खो खो महिला मध्ये प्रथम गडचिरोली, द्वितीय चंद्रपूर, कबड्डी पुरूषामध्ये प्रथम स्थान नागपूर ग्रामीण, द्वितीय स्थान चंद्रपूर, कबड्डी महिला मध्ये प्रथम स्थान वर्धा, द्वितीय नागपूर ग्रामीणने पटकाविला.

या कार्यक्रमास पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण, श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से), अपर पोलीस अधीक्षक डॉ. श्री. संदिप पखाले, उपविभागीय पोलीस अधिकारी कन्हान विभाग श्री. पुंडलिक भटकर, उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग श्री. अजय चांदखेडे, उपविभागीय पोलीस अधिकारी काटोल विभाग श्री. बापु रोहम, उपविभागीय पोलीस अधिकारी नागपूर विभाग श्रीमती पूजा गायकवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी उमरेड विभाग राजा पवार,

परीविक्षाधीन पोलीस उप अधीक्षक श्री. राहुल झालटे, पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, राखीव पोलीस निरीक्षक श्रीमती प्रतिभा भरोसे, सहायक पोलीस निरीक्षक शुभांगी वाझे, पोलीस उपनिरीक्षक भारत थिटे, कुमुदीनी पाथोडे, कलेगुरवार, राखीव पोलिस उपनिरीक्षक श्री. सुनिल ताकसांडे, प्रधान व इतर अधिकारी व अंमलदार उपस्थित होते.




पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर